# दुर्गा भागवत : पौरूष संपन्न व्यक्तिमत्व

**एस.डी.कोंडोलीकर**
मराठी विभाग
स्वा. से. श्री. क. रा. इन्नाणी महाविद्यालय, कारंजा (लाड) जि. वाशिम

## सारांश

*दुर्गा भागवतांसारख्या व्यक्तीचं व्यक्तिमत्व, त्यांचं लेखन हे आजच्या काळाशीही जोडलं जात असतं, कोणत्या ना कोणत्या प्रकारे वर्तमानाशी जोडलं गेल्याने ते आज ही तितकच नवीन वाटतं, विद्याजशी नित्यनूतन असते तसंच! त्यांनी निसर्गाशी जोडलेल नातं, त्यात शोधलेले मानवी जीवनाचा अर्थ व सत्य हे तर आज पर्यावरण समस्येला उत्तर आहे, म्हणून मग त्यांची आठवण येतेच. दुर्गा भागवत यांनी 60 पेक्षा अधिक पुस्तके लिहिली आहेत. बालवाङ्‌मय, कथा, कादंबरी, चरित्र, ललित निबंध, समीक्षा,वैचारिक लेखन, लोककथा, लोकसाहित्य, प्राणी विषयक, व....विषयक आणि बौद्धांच्या जातककथा अशा विविध विषयांवर त्यांनी लेखन केले. ललित आणि चिंतनशीलता यांचा प्रत्यय देणारी पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. त्यांच्या अनेक आव......त्याही प्रकाशित झाल्या असून व्यासंग आणि वाचनीयता यांची अनुभूती त्यातून मिळते.*

***मुख्य शब्दः*** *ऋतुचक्र, निसर्ग, निसर्गयान, ऋतु , प्रकृती, निसर्गचित्र, निसर्गगान.*

### पौरूष संपन्न व्यक्तिमत्व

1950 पासून त्यांचे विलक्षण वेधक असे ललित लेखन सुरू झाले. ऋतुचक्र (1956), भावमुद्रा (1960), व्यासपर्व (1964), रूपरंग (1968), या त्यांच्या पुस्तकांना महाराष्ट्र शासनाची पारितोषिके मिळाली. पैस ( 1971) या ललित लेख संग्रहाला साहित्य अकादमीचा पुरस्कारही मिळाला. या पुरस्कारांची मालिका पुढेही सुरू राहिली असती, परंतु व्यक्तिस्वातंत्र्याचा संकोच करणा—या आणीबाणी पर्वाला त्यांनी प्रखर विरोध केला. क—हाड येथे संपन्न झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणातून त्यांच्या स्वातंत्र्य प्रेमाचे अपूर्व दर्शन झाले. दुर्गा हे आपले नाव त्यांनी सार्थ केले. भारत हा मोठा तुरूंग झाला होता. लोकशाही धोक्यात आली होती. अशा काळात आणीबाणीचा तीव्र शब्दांत निषेध केला.

शासनाची वा अन्य कुणाचीही पारितोषिके स्वीकारणार नाही, असा निर्धार व्यक्त केला आणि पौरूषसंपन्न व्यक्तिमत्वाचे दर्शन घडविले. त्यासाठी तुरूंगवासही भोगला. विचारवंत, लेखकांवर कोणतीही बंधन आली, की विचार मरतो. विचार मेला की संस्कृती धोक्यात येते आणि विकृती येते. या धारणेतुन त्या जगत होत्या. या काळातील त्यांच्या आठवणी अमर आहेत. पु. भा. भावे यांच्या अध्यक्षतेखाली पुढचे साहित्य संमेलन पुणे येथे संपन्न झाले. तेव्हा अधिकार समर्पणाच्या प्रसंगी त्या पाच — दहा मिनिटांसाठी व्यासपीठावर आल्या. सप्त स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारे त्यांचे तेही भाषण संस्मरणीय ठरले.

### लेखनाची प्रेरणा

वाळूतली पाऊले हा दुर्गा भागवतांचा साधना साप्ताहिकात प्रकाशित झालेला पहिला ललित लेख. तो साने गुरूजींच्या प्रेरणेने लिहिला याचा त्या आवर्जुन उल्लेख करतात. 'साधने' साठी लिहा अशी गुरूजींनी त्यांना अनेकदा सूचना केली. पण मनासारखे लेखन जमेना. 'साधने' त लिहावे असे त्यांनाही मनापासून वाटत होते पण तो योगच येईना. लिहिण्याचा निर्धार करून त्या लेखन प्रवृत्त झाल्या. शनिवारी, रविवारी जागून लेख संपवला. नाव 'वाळूतली पाऊले' असे दिले. सोमवारी लेख गुरूजींकडे पाठवला. गुरूवारी त्यांचे कार्ड आले. त्यात त्यांनी तुमचा वाळूतली पाऊले (त्यांनी प्रथम काळाची पाऊले असे लिहून ते खोडून वाळूतली पाऊले असे नंतर लिहिले होते.) हा लेख मला मिळाला. मला तो आवडला. लवकरच साधनेत छापीन आणि काय नवल! शुक्रवारी त्यांनी आत्महत्या केल्याचे वृत्त ऐकले. मला त्यातही वचनपूर्तीचे समाधान मिळाले. गुरूजींमुळेच माझ्या ललित लेखनाला प्रारंभ झाला. यात यत्किंचित संशय नाही. त्यांच्या प्रेरणेशिवाय हे होणे शक्य नव्हते. असा ऋणनिर्देश त्यांनी निसर्गोत्सव मध्ये केला आहे.

## निसर्गायन

ऋतुचक्र मधील तेरा ही लेख 1950 साली साधना साप्ताहिकातून प्रकाशित झाले, अर्थात साने गुरूजींच्या पश्चात! 1956 साली ऋतुचक्र पुस्तक प्रसिध्द झाले. त्यानंतर त्याच्या चार – पाच आवृत्या प्रकाशित झाल्या. आज माझ्यासमोर पॉप्युलर प्रकाशनाने प्रसिध्द केलेली 2004 सालची आवृत्ती आहे. ऋतुचक्र या शीर्षकाचा पहिला लेख सुरूवातीला आहे. यावरूनच पुस्तकाचे नामकरण झाले असावे. आतील लेख पाहता मासचक्र असे पुस्तकाचे शीर्षक असावयास हवे होते. निसर्गाला पाहताना, त्याचा अंतर्वेध घेताना दुर्गा भागवत या त्यातून सतत माणसाला पाहतात, त्याचा शोध घेतात, हे लक्षात येते. माणसावेगळा निसर्ग त्यांना भावतच नाही. त्या केवळ निसर्गाच्या चित्रणात रमल्या असत्या तर कदाचित ते लेखन निर्जीव झाले असते. ''वाचक माझे नाव ऋतुचक्र पासून निसर्गाशी जोडीत आलेले आहेत, इतके की आता रूढीच झालेली आहे. मी निसर्गपूजक आहे हे खरे असले तरी ऋतुचक्र नंतर माझे स्वयंपुर्ण निसर्गायन जराही कमी जास्त झालेले नाही.'' उलट आता पन्नासहून अधिक वर्षांनी मी निसर्गात अधिकच विरघळून गेलेली आहे. निसर्गाच्या कवेत नाही असे मला काहीच दिसत नाही, असे त्या लिहितात.

बालकवींनी आपल्या कवितेत निसर्ग जिवंत केला. या निसर्गदर्शनातून त्यांना आरपार माणूस दिसत होता. आधुनिक मराठी साहित्यात बालकवींनी निसर्गाच्या माध्यमातून माणसाचे रूपदर्शन सर्वप्रथम घडविले. एका कोमल फुलात त्यांना रूपसुंदर अशी नवयुवती दिसली. तिला ते फुलराणी म्हणाले.

हिरवे हिरवे गार गालिचे –
हरित तृणांच्या मख मालींचे,
त्या सुंदर मखमालीवरती –
फुलराणी ही खेळत होती.
गोड निळया वातावरणात –
अव्याज मने होती डोलत,
प्रणय चंचला त्या भ्रूलीला–
अवगत नव्हत्या कुमारिकेला.
आईच्या मांडीवर बसुनी–
झोके घ्यावे, गावी गाणी,
याहुनि ठावे काय तियेला–
साध्या भोळया फुलराणीला?

पहिल्या तीन ओळीत एक अनामिक फुल आपल्या समोर उभे राहते पण नंतरच्या ओळींमध्ये भावभावनांचे प्रतीक असलेली युवतीच समोर येते, आईच्या मांडीवर विश्वासाने विसावणारी ही मुलगी लवकरच आईपासून काहीतरी लपवावे, अशा अवस्थेत येते. प्रणयातील नेत्र संकेतांचीही जाणीव नसलेली ही फुलराणी प्रेमविवाह करते. बालकवींच्या अनेक कवितांमधून मानवी भावनांचे मनोज्ञ चित्र साकारते. दुर्गाताईचे ललितलेखन याच वाटेवरचे पुढचे पाऊल होय.

## एकरूपतेचा हुंकार

दुर्गा भगवंताचे ललित लेखन हे अनुभवाच्या अमृतातून न्हाऊन निघाले आहे. 'अंथरूणावर मी निश्चेष्ट होउन पडलेली असतांना वा–याची एक झुळूक माझ्या ओठांना स्पर्श करून गेली आणि त्याच क्षणी मला जगण्याचा हुरूप आला'. मी अंथरूणावर उठून बसले. मग चार पावलं चालून बघितली. मग खिडकीतून बाहेर बघितलं. आणि जे बघितलं त्यातुनच 'ऋतुचक्र' झालं. मी कल्पना करून काहीही लिहिलेलं नाही. निसर्गाची आवड मला लहानपणापासून होती', असे त्या म्हणतात. प्रकृतीच्या प्रतिकूलतेवर मात करण्याची शक्ती त्यांना निसर्गाने दिली, असे त्यांचे कथन आहे. प्रतिभा रानडे यांनी विचारलेल्या एका प्रश्नाच्या उत्तरात त्या म्हणतात, 'मी निव्वळ निसर्ग बघितलाच नाही, तर मला असं वाटायला लागलं की, या सगळया निसर्गाच्या साखळी मधला मी म्हणजे देखील एक दुवा आहे. निसर्गाच्या साखळी मधली मी देखील एक कडी आहे. आणि त्यामुळेच मला पुर्णत्व आहे. झाडवेलींमध्ये देखील आत्मा दिसला. जिवंत व्यक्ती दिसल्या.' लेखिकेचे व्यक्तिमत्व आणि निसर्ग यांचे एक अपूर्व रसायनच तयार झाले. 'ऋतुचक्र' हा या एकरूपतेचा हुंकार आहे. आपल्या जीवनानुभवांकडे कलावंतांच्या भूमिकेतून पाहण्याचे सामर्थ्य त्यांच्या जवळ असल्याचा प्रत्यय त्यांच्या ललित लेखनांतून येतो, याचा पुरावा, 'झाडापानामध्ये मानवी प्रतिमा पाहण्याची सवय आमच्या मनाला नकळतच लागून गेलेली असते. एरवी तर्कशास्त्रावरच ज्यांचा पिंड पोसला गेला आहे त्या आमच्या सारख्या भौतिकवाद्यांनाही काही झाडे पाहिली की ती केवळ झाडे वाटत नाहीत. अगदी माणसांच्या काही निराळया प्रतिमा वाटतात. त्या असे एरव्ही कशाने झाले असते' ? या त्यांच्या उद्‌गारातून मिळतो.

## निसर्गाचे मानवीकरण

'ऋतुचक्र' मधील 'मेघश्याम' आषाढ' या लेखात बालगुंजाच्या झाडांचे सौंदर्य शब्दांकित करतांना त्या म्हणतात, 'फुल अगदी निर्गंध. पण अशी अतिशय लहान आणि मुलायम फुले चहूबाजूंनी धरलेली ती मंजिरी अत्यंत डौलदार आणि तितकीच कमालीची नाजूक दिसते. मुद्दाम पाहिल्याशिवाय नजरेत भरणार नाही, असे तिचे हे लाजरे लावण्य मला फार आवडते,'' लावण्य हे झाडाचेही वैशिष्ट असू शकते. पण लाजण्याचे सारे संदर्भ भारतीय स्त्रीच्या संदर्भातच शोभून दिसतात. 'निसर्गोत्सव' मध्ये एक प्रसंगचित्र बघावयास (अनुभवावयास, असे म्हणू या) मिळते. ती तीन पिले सारा वेळ एकत्र असत. त्यातले एक जरा दुबळे होते. ही दोघे मात्र भरपूर माजत चालली होती. त्या दुबळया मुलाकडे आई विशेष लक्ष देई,'' याचा अर्थ मातृत्व हे सर्वत्र सारखेच असते, असा मानता येईल. त्या तीन पिलांपैकी एक मादी आहे. दुर्गाताई तिच्या संदर्भात लिहितात, ''आईसारखीच पिसांची कंचुकी तिच्या अंगावर आता घट्ट बसू लागली होती. आईचाच हुकमती आवाज तिने उचलला होता. तीच तीक्ष्ण नजर तिच्यात आली होती. याचा अर्थ प्राण्यांमध्येही आनुवांशिकता येत असावी'', असे वाटते. ''वैशाखात कावळयांचे संसारीपणही बहरलेले असते. प्रणय रंगलेले असतात. वात्सल्य उमलत असते'', पण आता ''आषाढात नव्या सुंदर पानांची त्या डहाळयांवर दाटी झाली. प्रत्येक डहाळीवर पल्लवासारखी हालतांना दिसू लागली. ती वेल आपले ते असंख्य हात हलवून गेलेल्या फुलांना परत बोलावते आहे, असेच तिच्याकडे पाहिले की वाटते''. ''मागच्या पुढच्या ऋतूंतल्या महिन्यांना आपल्या मिठीत आवेगाने धरणारा ऋतू''. ''जननाचा देखावा नेहमीच करूण, भयावह आणि विस्मयजनक असतो. पाकोळया, पुष्कळ किटकांच्या माद्या नेहमीच अंडी घातल्याबरोबर मरतात हेही खरे. पण या जखमी पाकोळीचे ते मृत्यूपथावर नेटाने जीवनाची पावले रूतवून जाणारे बाळंतपण मी कधीच विसरणार नाही. मेंदू गेला तरी तिचा नारीदेह संज्ञाहीन झाला नाही.'' तिच प्रफुल्ल पळसाचे भगव्या फुलांचे तुरे, त्यांच्या त्या करंजीच्या आकाराच्या, तपकिरी मखमली परकर नेसून बसलेल्या सुंदर कळया मन ओढून घेतात, उदासिनता घालवितात''. ''निसर्गाच्या मानवीकरणाचे हे काही नमुने! श्रावणातल्या दुपारी, ऊन–पाऊस, मुंबईत वसंतागम, गुलमोहोराच्या आठवणी, झाडांचे आक्रंदन...किंवा हत्तीची गोष्ट सारखे निसर्गोत्सव मधील ललित लेख आणि ऋतुचक्र मधील सारेच लेख निसर्गाच्या माध्यमातून साकारलेल्या मानवाचे दर्शन घडविणारे आहेत. खरे तर सारे साहित्यच अंतिमतः मानवी जीवनासंबंधीचे भाग्य असते. रामायण–महाभारतातील राक्षसांच्या गोष्टी असोत, 'पंचतंत्र', 'इसापनीती' यातील कथा असोत किंवा व्यंकटेश माडगूळकर यांचे 'सत्तान्तर' असो, हे माणसासंबंधीत असते. ससा आणि कासवाची गोष्ट ऐकून ससा शहाणा झाला, इष्टस्थळी पोचून मगच त्याने विश्रांती घ्यायचा निर्णय घेतला, असे कधी झाले आहे का? तशी लेखकाची अपेक्षा तरी आहे का?

## गुंफण–साखळी

सूक्ष्म निरीक्षण, प्रत्ययकारी चित्रण आणि काव्यात्मलेखन ही दुर्गाभागवतांची वैशिष्टये होत. चिंतनशीलतेची साथ मिळालेले त्यांचे लेखन हे रूक्ष बनत नाही, अत्यंत आस्वाद्य बनते. वसंतहृदय चैत्र, चैत्रसखा वैशाख, जेष्ठातले पहिले मेघमंडळ, मेघश्याम आषाढ, श्रावण साखळी, पुष्पमंडित भाद्रपद, सोनेरी अश्विन, संध्यारंजित कार्तिक, प्रशांत आणि प्रक्षुब्ध मार्गशीर्ष, तालबध्द पौष, मायावी माघ आणि रूपधर फाल्गुन या लेखांच्या शीर्षकांकडे नजर टाकली तरी काव्यात्म शैलीची जाणीव होते. केवळ काव्यात्मतेसाठी ही शीर्षके लक्षात राहतात असे नाही. त्या त्या महिन्याचे मर्म अधोरेखित करण्याची क्षमता या विशेषणांमध्ये आहे, हे पटते.

चैत्रवद्य अमावस्या आणि वैशाख शुध्द प्रतिपदा यांच्यातील अंतर घटिका–पळे यांनी किंवा तास–मिनिटे यांनी स्पष्ट करता येईल. पहिल्या महिन्याचा शेवट आणि दुस–याची सुरूवात कालदर्शिकांमध्ये दर्शविता येते. पण त्या एका क्षणी निसर्गाचे रूप एकदम बदलत नसते. वसंत– ग्रीष्म ऋतूंमधील सीमारेषा स्पष्ट करता येत नाहीत. कारण निसर्ग हा एका क्षणात आपले रूप बदलत नसतो. रूपबदलाची ही प्रक्रिया संथपणे चालू असते. निसर्गाशी जवळीक साधणा–या लेखिकेला याचे भान आहे. म्हणूनच महिन्यातील किंवा एखाद्या ऋतूतील निसर्गाचे चित्रण करताना मागील – पुढील संदर्भ येतात. वैशाखचा महिना वास्तविक चैत्रातच गुंफलेला (पृ.16,) चैत्र–वैशाखातल्या दाट आणि शीतल अशा पौर्णिमेच्या चांदण्याचा स्पर्श जितका सचेतन आणि जीवनदायी वाटतो. (पृ.16,) ,आषाढातून

भाद्रपद सरता आणि आश्विनाची सुरूवात म्हणजे श्रावण – साखळी (50) सर्व ऋतूंचे सार या महिन्यात येते. वसंताचि पुष्पवैभव, जेष्ठाचे फलवैभव, श्रावणातला हिरवेपणा, आश्विनाताली वातावरणाची खुलावट आणि धान्यलक्ष्मीच्या मंगलमय पावलांची चाहूल, हेमंतातल्या गार वा–याच्या झुळका, शिशिरातली थंडीची लहर, सारे काही माफक प्रमाणात या महिन्यात अनुभवायला मिळते (60) असे अनेक उल्लेख ऋतुचक्र मध्ये येतात. महिन्यांची आणि ऋतुंची ही गुंफण साखळी दुर्लक्षित करता येण्यासारखी नसते. वॉटर टाईप कंपार्टमेंटस असे इंग्रजीत म्हणतात. तसे निश्चित कप्पे कालौघात दाखविता येत नसतात, हे त्यांच्या विवेचनाचे सूत्र आहे.

## दिलासा

''ऋ किंवा ऋतू म्हणजेच फिरता काळ, समस्त सृष्टीला कवटाळणारा, हरघटकेला हसवणारा, रडवणारा, नटवणारा आणि तिचा सगळा नखरा, साजश्रृंगार हातांनी ओढून काढून तिला उन्हात तापवणारा, वा–यात सुकवणारा, भिजवणारा कालाचा अगदी लहान अंश म्हणजेच ऋतू. काळाची पावलेच म्हणाना'', असे दुर्गा भागवत स्पष्ट करतात. ऋ या धातूचा अर्थ जाणे किंवा मिसळणे असा आहे. या निसर्गातील परिवर्तने हळुवारपणे टिपण्याची दृष्टी त्यांच्याजवळ आहे. निसर्ग तोच आहे. पण आता आमचे जीवन शहरी झाले आहे, अशी खंत त्यांनी व्यक्त केली आहे. या शहरीकरणामुळे माणूस हा निसर्गापासून दूर जाऊ लागला असल्यामुळे त्याला निसर्ग हा केवळ परकाच नव्हे तर भयदही वाटू लागला, हे बा.सी. मर्ढेकर यांनी

आज अंतरात भीती
खुल्या चांदण्यांची थोडी,
आणि नदीचा प्रवाह
अंगावर काटा काढी.
बरा म्हणून हा इथे
पारवा पा–याचा
बरी तोत–या नळाची
शिरी धार मुखी ऋचा

या शब्दांत स्पष्ट केले आहे. शहरीकरणाच्या या लाटेत निसर्गापासून दूर जाणा–या माणसांना निसर्गाबददल आकर्षण निर्माण करण्याची आणि ओढ लावण्याची क्षमता ऋतुचक्र मध्ये आहे. एक तरी ओवी अनुभवावी ही भुमिका वाचकांनी स्वीकारायला हवी. ऋतुचक्र चे नुसते वाचन पुरेसे नाही. शहरी मानवाला अजूनही निसर्ग असा हरघडीला ओढीत असतो. कामाचे घाईचे तास नि तास, दिवस, महिने वर्ष ही सोडल्यास, जे चार फुरसतीचे क्षण मिळतात, त्यावेळी आपण सहज खिडकीबाहेर डोकावतो. मग शेजारच्या घराच्या छपरावर पडलेले ऊनही किती वेगळे वाटते. त्या वाकडया तिकडया छाया, घराच्या भिंतीतच उगवून हलणारे वडाचे रोपटेही कसे जिवंत व जवळचे वाटते. ते घुमणारे पारवे तर मन ओढून घेतातच, हा केवढा दिलासा आहे. निसर्गातील सौंदर्याचा वेध घेण्याची दृष्टी शहरीकरणाच्या लाटेती पूर्णतः लोप पावली नाही, हेही नसे थोडके!

## प्रत्ययकारी लेखन विश्व

''फाल्गुन, चैत्र आणि वैशाख हे तीन महिने वसंताच्या पुष्पमुद्रेचे चिन्ह ल्यालेले, बेसुमार रंगांनी नटलेले, प्रखर उन्हाने अंग भाजणारे, पण त्याच वेळी अत्यंत शीतल सुखकारक अशा दक्षिणातिलांनी गात्रांना सुखविणारे, दृष्टीला भ्रांत करणारे, प्राणिमात्रातल्या निर्मितीच्या उन्मादक वृत्तींना चेतविणाारे असे हे महिने आहेत.'' अशा चित्रवेधक शब्दकळेने वसंतहृदय चैत्र या लेखाची सुरूवात होते. निसर्ग म्हणजे केवळ व..वेली नव्हेत, फुले फळे नव्हेत, पशू–पक्षी नव्हेत, द-या – खो-या नव्हेत, नद्या, तलाव–धबधबे नव्हेत. या सा–यांच्यामधून साकारणारे विश्व होय. दुर्गाताईंच्या शब्दकळेने हे सौंदर्य चिरंतन केले आहे. ''ठिकठिकाणी काही लोंबत्या आकाराची, तर काही वाटोळी चेंडूसारखी, तर काही पसरट गोल, अशी ही काळीकबरी घरटी म्हणजे वसंताच्या चित्रलिपीतली सुंदर विरामचिन्हे वाटतात मला'', लेखिकेच्या कल्पना वैभवाची साक्ष पटविणारी अशी कितीतरी सौंदर्यस्थळे ऋतुचक्र मध्ये आहेत. 'ऋतुचक्रातील ही निसर्गदृश्ये शब्दांकित करतांना लेखिकेने किती तपश्चर्या केली असेल, कुणास ठाउक? एका चित्रकाराला पौर्णिमेच्या रात्रीच्या समुद्राचे चित्र रेखाटावयाचे होते. त्यासाठी तो दुरून तिथे आला. पण आभाळ अभ्राच्छादीत होते. सूक्ष्म अवलोकन करणे त्याला शक्य झाले नाही. अनेक पौर्णिमेच्या रात्री सागर किनारी घालविल्यानंतर त्याने ते चित्र पुर्ण केले, असे कुठेतरी वाचण्यात आले. त्याच्या जिददीचे कौतुक वाटते. नामवंत साहित्यिक गो. नी.दांडेकर यांना फोटोग्राफीची हौस होती आणि कलावंताची दृष्टीही होती. त्यांच्या संग्रही असलेले एक छायाचित्र पाहण्यात आले. छायाचित्र

ज्या बाजूने घेतले जाते त्याच्या विरूध्द बाजूला छाया येते. त्या निसर्गचित्रात कोणत्याही बाजूला छाया नव्हती, हे पाहुन आश्चर्य वाटले. माझी शंका त्यांना विचारली. सकाळी कॅमेरा स्थिर केला. त्यावेळी एक छायाचित्र घेतले. त्याचठिकाणी दुपारी फोटो घेतला आणि सायंकाळी घेतला. या सर्व प्रक्रियेत रोल फिरविला नाही, असे काहीसे त्यांनी सांगितले. एक छायाचित्र काढण्यासाठी आप्पांनी दिवसभर तपश्चर्या केली. दुर्गा भागवतांची निसर्गचित्रे न्याहाळतांना त्यांच्या सूक्ष्म निरीक्षणशक्तीची जशी जाणीव होते. तशीच त्यांच्या परिश्रमांचीही! ऋतुचक्र मधील ललित लेखन वाचत असतांना अपूर्व अशा अवलोकनाची आणि त्यासाठी केलेल्या तपश्चर्येची महती वाढते. लोकादरास पात्र न होणारी बाळभळीची फुले, उद्यान फुलांच्या सुंगधाशी दिवसभर स्पर्धा करणारी देवबाभळीची फुले, भ्रमराच्या हळुवारतेने मध वेचणारी फुलचुखी – अशी कितीतरी दृश्ये वैशाखात दिसतात. जिददीने व घरटे उभारण्याचा प्रयत्न करणारा कावळा केसांच्या गुंतावळीत गुंतून पडतो आणि प्राणाला मुकतो. अंतःकरण पिळवटून टाकणारे हे चित्र याच लेखात आढळते. सामान्यांना माहीत नसणा–या अज्ञानाचा वेध घेणारी दुर्गा भागवतांची प्रतिभा ही बाराही महिन्यातील आगळयावेगळया निसर्गचित्राात रंगून जातांना दिसते.

ऋतूचक्र मध्ये रूक्ष असे निसर्गवर्णन येत नाही. त्या निसर्गदर्शन घडवितात. त्यांनी शब्दांकित केलेला निसर्ग आपण पाहत आहोत. इतकेच नव्हे तर अनुभवत आहोत असे वाटते. डॉ.मीना वैशंयायन यांनी दुर्गा भागवतांच्या समग्र साहित्याचा चिकित्सक अभ्यास करून मुंबई विद्यापीठातून आचार्य (पी.एच.डी.) ही पदवी मिळविली. दुर्गापर्व या नावाने त्यांचे संशोधन प्रकाशित झाले आहे. ही सारी वर्णने वाचकांच्या मनातील भावभावनांना संवेदनांना जणू आवाहन करतात. रूप, रस, गंध, नाद, स्पर्श या सा–या संवदेनांची अनुभूती देणारे, त्या संवेदना उत्तेजित करून त्यांचे समाधान करणारे असे हे दुर्गाबाईंचे लेखन आहे. जन्म मृत्यूच्या अखंड चक्राच्या गतिबरोबर फुलणारे, फळणारे, कोमेजणारे आणि पुन्हा अंकुरणारे असे हे सृष्टीजीवन किती आकर्षक आहे, तुमच्या आसपास आहे आणि तुम्हाला आनंद देते आहे असा प्रत्यय, अशी जाणीव हे सारे वर्णन निसर्गामध्ये असणारे प्राणीजीवनातील क्रौर्य, वात्सल्य या भावनांचा सुध्दा दुर्गा बाईंनी विविध प्रसंगांद्वारे अनुभव दिला आहे. त्याचप्रमाणे जन्म–मरणाच्या संस्कारांचाही प्रत्यय दिला आहे. असे हे प्रत्ययकारी लेखन विश्व आहे. ऋतुचक्र आणि अन्य ललित लेखनातील साक्षात दर्शन घडविणारे ललित हे विलक्षण वेधक आहे.

## मुग्ध करणारा अविष्कार

गुजगोष्ट, लघुनिबंध, ललित निबंध अशी विविध परिवर्तन स्वीकारणारा हा लेखनप्रकार विलक्षण आत्मनिष्ठ आहे. येथे लेखक हा स्वतःच्या अनुभवांना शब्दरूप देताना 'मी' ला विसरत नाही. एका मी चे अनुभव विश्व आस्वाद्य होते तेव्हा इतर 'मी' ना ही ते आपलेच वाटते. साहित्यः अध्यापन आणि प्रकार हा मराठीतील नामवंत समीक्षक प्रा.वा.ल. कुळकर्णी गौरव ग्रंथ आहे. त्यात ललित निबंध हा आनंद यादवांचा लेख समाविष्ट आहे. त्यात या प्रकारातील 'मी' चे स्वरूप स्पष्ट करताना ते लिहितात, ''अनुभवांची भारावस्था, त्यातील काव्य, सूक्ष्म नाटय, कल्पना, संवेदना, प्रतिमा, त्यांच्या विविध कळा, त्यातील चिंतन इत्यादी एकूण अनुभवाच्या चैतन्यांगांना महत्व आले. त्यामुळे हा साहित्यप्रकार एका व्यक्तिमत्वाचा (इंडिव्हिज्युॲलिटी), मी या आविष्कार म्हणून लक्षणीय ठरला. दुर्गा भागवतांच्या ऋतुचक्र मधून अभिव्यक्त झालेला हा मी बहुश्रुत, चिंतनशील आणि हळुवार मनाचा आहे. मी च्या अनुभूतीला विश्वात्मकरूप देण्याची क्षमता असल्यामुळे यातील असंख्य स्थित्यंरांचे आपणही साक्षी बनतो.

जीवनावर असीम श्रध्दा असलेले मन ऋतुचक्राच्या पानापानांतून व्यक्त होते. ''मुख्य म्हणजे तुम्हाला जोपर्यंत ज्ञानाची हाव असते. रोज काहीतरी नवीन समजून घ्यावं, शिकावं, काहीतरी करावंसं वाटतं, ते तुम्ही बघू शकता, तोपर्यंत तुम्ही जगण्यातला आनंद घेऊ शकता. तुम्ही सुखात असता. हे सगळं मी आजही सत्त्याऐंशीव्या वर्षी करू शकतो, याचा आनंद आहे'', असे त्या स्पष्ट करतात. जीवनानंद उपभोगणा–या तृप्त मनाचा मुग्ध करणारा आविष्कार म्हणजेच ऋतुचक्र होय.

## चिरंतनाचे वरदान

काळाची पावले साकार करणारे ऋतुचक्र हे पुस्तक अगदी छोटेसे आहे. वेधक आणि बोलकी रेखाचित्रे कुणाची आहेत, कुणास ठाउक? ती वगळली तर शंभरपृष्ठांमध्ये तोही क्राउन साईझच्या सर्व मजकूर समाविष्ट होतो. हे इवलेसे

पुस्तक चिरंतनाचे वरदान घेवून आलेले आहे. मराठी वाङःमयाच्या इतिहासात गौरवपूर्वक शब्दांत या पुस्तकाची नोंद घ्यावी लागेल, इतके हे मौलिक आहे. ऋतुचक्र वाचनाने निसर्ग सौंदर्याचा आस्वाद घेण्याची प्रेरणा मिळाली तर या लेखनाचे सार्थक होईल.

## स्त्री चिंतन

1975..च्या आणीबाणीत लादल्या गेलेल्या बंधनाबददल चर्चा सुरू असतांना खाजगीत बोलतांना कुणीतरी दुर्गाबाईंनी त्यावेळी दाखवलेल्या धैर्याबददल प्रशंसोदगार काढले आणि म्हटले, 'सगळयांचे आवाज बंद केले गेले असतांना ज्या थोडक्या लोकांनी आवाज उठवला त्यात दुर्गाबाई ठसठशीतपणे लक्षात राहिल्या. एका बाईमाणसानं धैर्य दाखवावं हे विशेष!

ते ऐकताना मनात आलं, बाईच्या बाबतीत हे असं 'बाई माणूस' असणं महत्वाचं होतं का? त्यांच्या दृष्टीनं कोणत्याही प्रकारचं न्याय स्वातंत्र..प्राप्त करून घेताना स्त्री–पुरूष हा भेद गैर –लागू होता. आणीबाणीच्या काळापर्यंत 1975 पर्यंत मराठी ललित गद्य–लेखिका, संशोधक, व्यासंगी स्त्री म्हणून त्यांचं स्थान आगळ होतं. पण आणीबाणीत त्यांनी घेतलेल्या जाहीर व ठाम भूमिकेमुळे लेखन–स्वातंत्र्य आणि एकूणच व्यक्तिस्वातंत्र्य. या विषयी आग्रही असणा–या लेखिका म्हणून त्यांची प्रतिमा समाजापुढे विशेषत्वाने पुढे आली. योगायोग असा की, त्याच वर्षी त्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष झाल्या. त्यामुळे आपली भुमिका मांडण्यासाठी त्यांना व्यापक व्यासपीठ मिळालं. दुसरा योगायोग असा की, 1975 .हेच वर्ष आंतरराष्टीय महिला वर्ष म्हणूनही जाहीर झालं होत. तेव्हापासून स्त्रीमुक्ती चळवळीला मोठीच प्रेरणा मिळाली होती.

आणीबाणीनंतर त्यांनी प्रत्यक्ष कोणत्या चळवळीत भाग घेतला नाही, पण आपल्याला न पटणा–या गोष्टी विरूध्दची मते त्या जाहीरपणे मांडत राहिल्या.

त्या वेळच्या स्त्रीमुक्ती चळवळीत त्यांनी सक्रीय भाग घेतला नाही, त्याबददल त्यांना अनेकदा छेडलं जाई. पण त्यांचं त्याबाबतीतल मत पक्क होत. स्त्रीमुक्ती चळवळीच्या पुरस्कर्त्या स्त्रिया एक प्रकारे पुरूषांशी स्पर्धा करतात असं त्यांना वाटे. व्यक्ती म्हणून स्त्रीला समान हक्क, समान प्रतिष्ठा मिळायला हवी, तिच्यावर कसलेही अन्याय, अत्याचार होता काम नयेत हे त्यांना मान्यच होतं. पण या सर्व गोष्टी तिनं स्वसामर्थ्यानं आपल्या कर्तुत्वाने मिळवाव्यात अस त्यांना वाटे. काहीशी आदर्शवादी अशीच भुमिका होती ती! स्त्रिया सामर्थ्यशाली आहेत, पुरूषांनी पुरुष म्हणून अधिकार गाजवू नये वा पुरूषी वर्चस्व गाजवू नये आणि स्त्रिनेही विशेष सवलती वा आरक्षणाची अपेक्षा ठेवू नये असं त्यांचं मत होतं.

1990 .मध्ये महिलांना महापालिका निवडणूकीत 30टक्के आरक्षण दिल्याबददल चर्चा झाल्यानंतर दुर्गाबाईंनी त्याबददल तीव्र शब्दात निषेध नोंदविला यामुळे स्त्रिया लाचार होताहेत, स्वाभिमान सोडताहेत असं त्यांना वाटलं. अशामुळे पुर्वीच्याच स्त्री, शूद्र, व्दिजबंधू या सदरात स्त्रिया मोडतील, नवीन भेद निर्माण होतील अशी भिती त्यांना वाटली होती.

स्त्रियांजवळ कर्तुत्व आहे, क्षमता आहे, वाव मिळताच ते सिध्द होतं हे त्यांनी त्यावेळी सोदाहरण सिध्द केल होतं. मात्र त्यासाठी आरक्षण नको, संघर्ष हवा असं त्या मान्य करीत होत्या.

मग बाईंना स्त्री–जीवनाची खरी ओळख नव्हतीच का? त्यांच्यावर होणार अत्याचार, शतकानुशतकं त्यांना दिलं जाणारं दुय्यम स्थान, अनंत प्रकारे अनंत गोष्टींबदल त्यांच्यावर घातली जाणारी बंधन यांची जाणीव त्यांना नव्हती? असे प्रश्न मनात येतात.

पण त्यांच्या लेखनातून, व्यक्तिमत्वातून दिसतं की, तसं नव्हतं. सीता त्याग विषयी रामाला बोल लावणा–या बाई, रस्त्यावरच्या झाडाखाली संसार थाटणा–या कष्टकरी स्त्रीला जाणीवपुर्वक न दुखावणा–या दुर्गाबाई काहीशा वेगळयाच वाटायच्या.

भागवतांच्या घरातल्या मोकळया व उदारमतवादी वातावरणाने त्यांना लहानपणी घरी मुलगी म्हणून वेगळी वागणूक कधी मिळाली नाही. सर्व प्रकारचं स्वातंत्र्य मिळालं. पण त्याचमुळे हे स्वातंत्र्य एक मूल्य आहे, त्यामागची जबाबदारी आपण ओळखली पाहिजे हेही त्यांना उमगलं.

आजूबाजूच्या स्त्रियांना समाजाकडून त्यांच्या घरातून मिळणारी वागणूक त्यांना टोचत असे. पुढे त्यांनी वेळोवेळी त्याबददल लिहिले देखील. स्त्रियांना अनेकदा वेगवेगळे ताण सहन करावे लागतात. अशावेळी कष्ट हाच त्यांचा सोबती असतो, असं त्यांचं निरीक्षण आहे.

विद्येच्या वाटेवर या आपल्या लेखात त्या म्हणतात कन्या धन परक्याचे ही जाणीव आई–बापांच्या हृदयात मुलीच्या जन्माबरोबर सहस्त्र सुयांनी

गोंदली जाते आणि समाज ते गोंदणे जोजवीत राहतो. पूर्वी व आताही! ज्याच्या पदरी लेकी त्याच्या पदरी पाप ही म्हण येता जाता ऐकवली जाते. मुलगी ही मुलगी म्हणून जन्मालाच येत नसे जणू. ज्याचा पुढे टिकाव धरू शकणारी सून म्हणूनच ती जन्माला येई. तिला पोरवय नसे. व्यक्तिमत्वही नसे, मग व्यक्तिमत्व तर राहिलेच. तिचे सारे गुण, सारे कौशल्य हे त्या वधुपरीक्षेसाठी असे.

दुर्गाबाई आपल्या लेखांत म्हणतात, समाजाची ही तत्कालीन रीत जाणूनच माझ्या अविवाहित आत्याने मला गृहदक्ष तर केलेच पण कानमंत्र दिला की, मुलींनो चोळीला आणि पोळीला महाग होवू नका! त्या म्हणतात तिच्या सांगव्यामुळे स्त्रीच्या आर्थिक स्वातंत्र्याची जाणीव मनात ठसली. ते स्वातंत्र्य स्त्रीने कधी गमावून उपयोगी नाही हे मनोमन पटले.

स्त्रीच्या क्षमता, सामर्थ्य याबददल इतक्या आश्वस्त असत की, तिला कोणतीही गोष्ट अशक्य नाही असे त्यांना वाटे. स्त्रीची म्हणून समजली जाणारी कौशल्ये म्हणूनच त्यांनी कधी गौण, दुय्यम, हलक्या दर्जाची मानली नाहीत. त्यातही विद्याप्राप्ती असते असे त्या मानत. मग घरकाम, विणकाम, पाककला, भरतकाम या सा—या कलांमध्ये त्यांनी सहजच नैपुण्य मिळवलं. एवढंच नव्हे तर निसर्ग आणि मानवी मन यांची सांगड त्यांना भरतकामाच्या टाक्यांत, नमुन्यात, चित्रात, गोंदण्यात, रांगोळीत, प्रथांमध्ये, नांदामध्ये आवर्तित होताना दिसली. मानवी जीवनाची ती प्रतीके आहेत आणि त्यांच्या व्दारा माणसाच्या प्रादेशिक व सार्वत्रिक प्रेरणांची नेमकी चाहूल आपल्याला लागते असं त्यांना वाटत असे.

स्त्री या गोष्टी अवगत करते व त्यामुळे ती संस्कृतीची वाहक असते. हे त्यांनी वेळोवेळी मांडले. दुर्गाबाईंनी जीवन वाटचाल निरखली की, तसेच त्यांचे साहित्य हया मधून डोकावराणे त्यांचे विचार यावरून स्त्रीचं सामर्थ्य ओळखून त्या सहज, नैसर्गिक भावाने वागल्या असं दिसतं. सर्व प्रकारची विद्या त्यांनी अवगत केली आणि मुक्तहस्ते इतरांना दिली असं दिसतं. त्यामुळे बौध्द जातकांचा अनुवाद करतांना किंवा ज्ञानोबांचा पैस धुंडाळताना त्या जितक्या रमत तितक्याच त्या एशिया —टिकमधील अनेकांना वेगवेगळे पदार्थ खायला घालताना किंवा कुमुदताई मेहतांसारख्या मैत्रिणीच्या नातवाला स्वेटर विणताना रमत, आणि म्हणत अगं, बाईचा हात नि बुध्दी सारखी चालती राहिली पाहिजे!

नैसर्गिकपणेच येणारी स्त्रीत्वाची जाणीव त्यांच्या लेखनातही दिसतं आणि स्त्रीलाच आठवावेत असे संकेत, उपमा सहजपणे येत. म्हणूनच जेष्ठातला पिवळा प्रकाश म्हणजे त्यांना विश्वजननीच्या अंगावर उमटलेली सुंदर गर्भच्छाया वाटे किंवा आकाशात भरून आलेले ढग पाहून गाभण मेघमाला आळसून आकाशभर ठिकठिकाणी झोपून राहिल्या आहेत! असे वाटे.

## संदर्भ


**दुर्गा (1956)** भागवत ऋतुचक्र, पापुलर प्रकाशन मुंबई.

**दुर्गा (1968)** भागवतरूपरंग, पापुलर प्रकाशन मुंबई.

**दुर्गा (1971)** भागवत पैस, पापुलर प्रकाशन मुंबई.

**मीना (2012)** वैशंपायन मुक्ता—(लोकसत्ता चतुरंग), पापुलर प्रकाशन मुंबई.